क्रमांक : ४८३ /ई-१
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय
विधान भवन, मुंबई-४०० ०३२
दिनांक : ०६ जानेवारी, २०२०

प्रेषक :
सचिव (कार्यभार),
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

प्रति,
**विधानपरिषदेचे सर्व सन्मा.सदस्य**

**विषय : <u>मा.सदस्यांकडून तारांकित प्रश्नांच्या सूचना स्वीकारण्याबाबत</u>**

**महोदय/महोदया,**

निदेशानुसार आपणांस कळविण्यात येते की, महाराष्ट्र विधानपरिषदेच्या **सोमवार, दिनांक २४ फेब्रुवारी, २०२० रोजीपासून** सुरु होणाऱ्या आगामी अधिवेशनातील तारांकित प्रश्नांच्या उत्तराचा दिनांक व त्या दिवसाकरीता गटामध्ये समाविष्ट असलेले मा.मंत्री तसेच तारांकित प्रश्न सूचना मिळण्याचा अखेरचा दिनांक इत्यादी नमूद असलेला चक्रानुक्रम पत्रक भाग-दोनद्वारे सर्व मा.सदस्यांना **सोमवार, दिनांक ६ जानेवारी, २०२० रोजी** वितरीत करण्यात येत आहे. (प्रत सोबत जोडली आहे)

मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांनी दिलेल्या निदेशानुसार **<u>पहिल्या टप्प्यासाठी</u>** मा.सदस्यांकडून प्रत्येकी ३१ तारांकित प्रश्न सूचना **शुक्रवार, दिनांक १० जानेवारी, २०२० रोजी सकाळी ११.०० ते सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत** QIS या संगणक प्रणालीवर ऑनलाईन (Online) पध्दतीने स्वीकारण्यात येतील.

पहिल्या टप्प्यातील तारांकित स्वीकृत प्रश्नांचे सदस्यनिहाय बॅलट **मंगळवार, दिनांक २८ जानेवारी, २०२० रोजी दुपारी १.०० वाजता मध्यवर्ती सभागृह, पाचवा मजला, विधान भवन, मुंबई** येथे घेण्यात येईल. **संसदीय कार्य विभागाने पाच आठवडयांचा म्हणजेच सोमवार, दिनांक २४ फेब्रुवारी, २०२० ते शुक्रवार, दिनांक २७ मार्च, २०२० रोजीपर्यंतचा कार्यक्रम कळविला असला तरी मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांनी दिलेल्या निदेशानुसार सदर कार्यक्रमाशिवाय एक आठवडयाचा जादा कार्यक्रम चक्रानुक्रमात दाखविण्यात येत आहे.**

शुक्रवार, दिनांक १० जानेवारी, २०२० रोजी पहिल्या टप्प्यात प्राप्त झालेल्या तारांकित प्रश्न सूचनांवरील कार्यवाहीबाबतचा तपशील **मंगळवार, दिनांक २८ जानेवारी, २०२०** रोजी सकाळी ११.०० ते १२.०० वाजेपर्यंत या सचिवालयातील ई-१ कक्षात (कक्ष क्रमांक १३०४) मा.सदस्यांना अथवा त्यांनी प्राधिकृत केलेल्या त्यांच्या प्रतिनिधींना उपलब्ध करून देण्यात येईल.

कृपया याची नोंद घ्यावी अशी आपणांस विनंती आहे.

आपला,

**( जयवंत राणे )**
अवर सचिव (समिती),
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

**याची प्रत माहितीसाठी :**

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व पक्ष कार्यालये,**
**विधान भवन, मुंबई-४०० ०३२.**

C:\Users\e1.MLSDOM\Desktop\BUDGET SESSION 2019\(५) चक्रानुक्रम + पत्रक भाग-2.doc